# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता सातवी : पूर्व चाचणी

इयत्ता : सातवी | एकूण गुण : ३०

विद्यार्थ्याचे नाव : .................................................................................... हजेरी क्र. : ....................

शाळेचे नाव : .............................................................................................. दिनांक : ......................

**प्र. १) खाली दिलेला उतारा वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही. (06.01.09)** **(५ गुण)**

सयाजीराव गायकवाड राजवाड्यात परतले; पण वडाच्या झाडावर माकडासारखी चढणारी आणि उतरणारी पोरं त्यांना नजरेसमोर दिसत होती. घडलेला प्रसंग त्यांनी महाराणीसाहेबांना सांगितला. त्यांनीही तो खेळ पाहण्याची इच्छा व्यक्त केली. सयाजीरावांनी विद्याधिकारी श्री. काटावालांना बोलावलं. नजरपागेतली ती पोरं शोधून आणायचा हुकूम केला. नारायणराव घाटगे यांनी त्या पोरांची नावं व राहण्याचं ठिकाण सांगितलं.

विद्याधिकाऱ्यांचा शिपाई त्या भागात पोहोचला. त्यानं पोरांचा शोध घेतला. गजानन आणि काळूला साहेबांकडे घेऊन आला. ''झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले. हा खेळ महाराणीसाहेबांनाही पाहायचाय. उद्या तिसऱ्या प्रहरी तुम्ही दोघे राजवाड्यात या!'' विद्याधिकारी म्हणाले.

अ) मुले कोठे खेळत होती?

..........................................................................................................

ब) मुले कोणता खेळ खेळत होती?

..........................................................................................................

क) परिच्छेदातील नामे शोधून लिही.

..........................................................................................................

ड) तुम्हाला कोणकोणते खेळ आवडतात? किमान ५ खेळांची नावे लिही.

..........................................................................................................

..........................................................................................................

इ) तुझ्या आवडत्या खेळाबाबत एक सूचना तयार कर.

..........................................................................................................

**प्र. २) दिलेल्या सूचनेनुसार बदल करून वाक्य पुन्हा लिही. (06.01.28)** **(५ गुण)**

१) प्रश्नार्थक सर्वनाम असलेले वाक्य लिही.

.......................................................................................

२) दिलेल्या वाक्यातील सहाय्यक व संयुक्त क्रियापद लिही.

.......................................................................................

३) भावना अभ्यास करते. (दिलेले वाक्य अपूर्ण भूतकाळात लिही.)

.......................................................................................

४) दिलेला कर्ता वापरून सकर्मक वाक्य बनव. कर्ता : अथर्व

.......................................................................................

५) राघव हुशार, चाणाक्ष व चपळ मुलगा आहे. (दिलेल्या वाक्यातील विशेषणे अधोरेखित कर.)

**प्र. ३) खालील कविता वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही. (06.01.08)** **(५ गुण)**

झाड आहे हिरवेगार,
वारा देते थंडगार
झाडाच्या सावलीत मी बसते,
झाड खुदकन गालात हसते
झाड देते माया, झाड देते छाया
झाडावर भरते पक्ष्यांची शाळा,
झाडाखाली सर्व प्राणी होतात गोळा
झाडाला लागतात सुंदर फुले,
फुले तोडायला येतात मुले
झाड आहे माझा मित्र,
माझ्या मनात राहते नेहमी झाडाचे चित्र

१) कवितेत आलेल्या यमक जुळणाऱ्या शब्दांच्या कोणत्याही दोन जोड्या लिही.

.......................................................................................

२) खालील शब्दांसाठी कवितेत आलेले विरुद्ध अर्थाचे शब्द शोधून लिही.

अ) रडते : ..........................        आ) जोडणे : ..........................

३) कवितेला शीर्षक द्या.

....................................................................................................

४) झाडाचा आपल्याला काय काय उपयोग होतो ते थोडक्यात लिही.

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

**प्र. ४) शेतकऱ्याबाबत माहिती लिही. (06.01.25)** **(५ गुण)**

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

**प्र. ५) बसचे वाहक (कंडक्टर) व तुमच्यातील संवाद कल्पनेने लिही. (06.09.14)** **(५ गुण)**

....................................................................................................

....................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

**प्र. ६) खालील परिच्छेद योग्य आरोह–अवरोहांसह वाच.** (06.01.11) **(५ गुण)**

समजा दमयंती जेवत असेल अन्तिला कोणीतरी म्हणाले, 'खेळायला येतेस का?' तर दमयंती जेवण अर्धवट सोडून खेळायला पळेल. एवढा खेळ तिला जीव की प्राण. मग तो कोणताही खेळ असो, मैदानी असो वा बैठा खेळ असो. दमयंती त्यात तल्लीन होऊन जाते. असा एकही खेळ नाही जो तिला आवडत नाही. बैठ्या खेळात ती जेवढी तरबेज तेवढीच मैदानी खेळातही. सागरगोटे, चल्लसआठ, काचापाणी, पत्त्यातील सावकार–भिकार अशा खेळांत जिंकणे म्हणजे तिच्या डाव्याहातचा मळ. मैदानी खेळ खेळताना कधी कधी ती एवढी हमरीतुमरीवर येते, की जणू आता तिचे पुढच्या खेळाडूबरोबर कडाक्याचे भांडण होईल; पण एकदा का खेळ संपला, की प्रतिस्पर्ध्याच्या हातात हात घालून चाललेली दिसणार हे नक्की. दमयंती म्हणते, ''खेळामुळे शरीराचा व्यायाम होतो. मन ताजेतवाने होते. हाता–पायांचे स्नायू बळकट होतात. हृदय व फुप्फुसांची कार्यक्षमता वाढते. आपल्याला दिवसभराच्या कामाने आलेला थकवा, मरगळ जाऊन आपल्यात नवा जोश, उत्साह निर्माण होतो. कबड्डी, खो–खो, लंगडी, डॉजबॉल यांसारख्या मैदानी खेळांमुळे स्वतःवर येणाऱ्या संकटांशी सामना करण्याची ताकद आपल्यात निर्माण होते.'' प्रत्येकाने रोज थोडे का होईना; पण खेळलेच पाहिजे. तुम्हाला निरोगी राहायचे असेल, तर योग्य आहाराबरोबर योग्य व्यायाम असायला हवा अन् खेळांतून शरीर व मनाला मिळणारा व्यायाम सर्वांगसुंदर व्यायाम असतो, नाही का?